

# चलो मिरॅमॅक आणि इतर अद्भुत कथा

- नीलिमा करमरकर





कुमारवय म्हणजे परीकथांचं विश्व मागे पडून साहसकथा, अद्‌भुतकथा, रहस्यकथा यात रमण्याचे दिवस !

या पुस्तकांतील प्रत्येक कथा म्हणजे अद्‌भुतरम्य दुनियेतील अनोखी सफरच !

विविध देशातील अद्‌भुत आणि गूढ ठिकाणांच्या पार्श्वभूमीवर या कथा घडतात. त्यामुळे जगातील अनेक गूढरम्य ठिकाणं - तेथील गुहा, दऱ्या, पर्वत, चित्रविचित्र प्राणी आणि माणसं व त्यांची संस्कृती, तेथे घडणारे चमत्कार, घडणाऱ्या घटना यातून प्रत्येक कथेत एक वेगळंच गूढ-रहस्य आपल्यासमोर येतं आणि चकित करून जातं.

या सगळ्या रहस्यमय गोष्टींचा पाठपुरावा करणाऱ्या साहसी कुमार आणि युवा कथानायकांशी आपली नक्कीच मैत्री जुळेल.

खास कुमारवयीन वाचकांसाठी कल्पनारम्य, अद्‌भुत विश्व आणि वास्तव यांचं अनोखं मिश्रण असणाऱ्या अद्‌भुत कथांची ही एक अनोखी भेट !



**अद्‌भुत कथासंग्रह**
छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
किंमत ₹ १२०/-
jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

# चलो मिरॅमॅक
# आणि इतर
# अद्भुत कथा


**लेखिका**

**नीलिमा करमरकर**



**छात्र प्रबोधन**

**ज्ञान प्रबोधिनी**

५१०, सदाशिव पेठ,
पुणे - ४११०३०

♣ **'चलो मिरॅमॅक आणि इतर अद्भुत कथा' (कथासंग्रह)**
('छात्र प्रबोधन' मध्ये २०२१ पर्यंत प्रकाशित झालेल्या लेखिकेच्या कथांचा संग्रह)

♣ **प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, 'छात्र प्रबोधन',
ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030 ☎ (020) 24207 174/175
email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
website - www.chhatraprabodhan.org

♣ **लेखिका**
नीलिमा करमरकर
५०१ 'रेनेसान्स' अपार्टमेंट,
डॉ. केतकर रस्ता, ऑफ प्रभात रोड, पुणे - ०४
मोबाइल - ९८२२०८२८९५, email - neelimakishor51@gmail.com

© स्वामित्व लेखकाच्या स्वाधीन

♣ **अक्षर जुळणी** : 'छात्र प्रबोधन' ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०

♣ **मुद्रित शोधन** : रंजना दाते

♣ **मुखपृष्ठ व आतील चित्रे**
गिरीश सहस्रबुद्धे, निलेश जाधव, देवेंद्र कोतवाल, राहुल धामणे, सचिन जोशी, चंद्रशेखर जोशी

♣ **शीर्षक लेखन** – बाबू उडुपी

♣ **वितरण**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०
ऑनलाइन खरेदीसाठी **jpprakashane.org**

♣ **प्रथम आवृत्ती** : राष्ट्रीय सौर भाद्रपद, शके १९४४, सप्टेंबर २०२२

♣ **किंमत** : ₹ १२०/-

***'Chalo Miramac Ani Ithar Adbhoot Katha'***
**(Collection of Pre-published Stories from Chhatra Prabodhan Magazine for Youngsters)**

# प्रस्तावना

मराठी वाङ्मयात खास कुमार वयोगट डोळ्यांसमोर ठेऊन फारशा कथा लिहिल्या गेल्या नाहीत. एकतर बालकथा नाही तर प्रौढांसाठीच कथा लिहिल्या जातात. कुमारवयातील मुलांचं भावविश्व आजच्या काळात झपाट्याने विस्तारत आहे असं दिसून येतं. या वयातील मुलं ना धड किशोर ना धड युवा अशा अवस्थेत असतात.

मी जेव्हा माझ्या या वयातील अनुभवांचा विचार करते, तेव्हा मला आठवतं की या वयात परीकथांचं विश्व मागे पडून मला स्वत:ला रहस्य कथा, साहसकथा, अद्भुतकथा आवडत असत. नवल, धनंजय यांसारख्या मासिकांमधून यांचा खजिना असायचा. अद्भुतकथा वाचताना खूप सारी उत्सुकता असायची. पुढे काय होणारे याच्या कल्पनांचे मनोमन पूल बांधून त्यांच्यात गटांगळ्या खायला मजा येत असे. उन्हाळ्याच्या दिवसांत रात्री गच्चीवर गप्पांचा फड जमे आणि त्यातच कोणीतरी अद्भुत कथांची पुडी सोडून, 'हा' मला स्वत:ला आलेला गूढ अनुभव आहे अशी थाप मारत असे. ऐकताना थोडीशी भीतीची लहर दौडायची. तरी पण उत्सुकता, कुतूहल, आनंद, भय अशा संमिश्र भावना मनात असायच्या.

पुढे जाऊन याच वयोगटातील मुलांसाठी अनेक वर्षे अध्यापन करताना आणि सध्या छात्र प्रबोधन या कुमारांच्या मासिकासाठी काम करताना मुलांचे भावविश्व आणि त्यांची आवड याची फार जवळून ओळख झाली. आजही *हॅरी पॉटर, लॉर्ड ऑफ द रिंग्ज, हॉबिट* यांसारखे चित्रपट पाहताना मुलं खूप रमून जातात. याचाच अर्थ आपल्या भोवतालच्या वास्तव जगात जे नाही अशा विश्वात रमणं हा कुमारवयीन मुलांचा स्थायीभाव आहे. फक्त त्यामागेही थोडीफार तार्कीक सुसंगती असणारी कल्पना मुलांना आता जास्त भावते हे लक्षात आलं. जीवनामध्ये नवरसांना असणारं स्थानही यातून अधोरेखित होतं. मनाला चकित करून टाकणाऱ्या अद्भुत विश्वात रमताना माणसाला वास्तवाचा विसर पडतो आणि वास्तवात न अनुभवलेला आनंद तो अशा अद्भुत लेखनातून घेतो. ही प्रेरणा कुठेतरी या कथालेखनामागे होती.

या कथासंग्रहातील कथा लिहिताना मला माझ्या भूगोल विषयाच्या अध्यापनाचा अनुभव महत्त्वाचा ठरला. मला स्वत:ला प्रवासाची आवड

असल्याने मी देश–परदेशात बरीच भ्रमंती केली आहे. त्यातील काही ठिकाणांना भेटी देताना मला माझ्या कथांचे कथाबीज सापडले. *मिरॅमॅक केव्हज* बघताना त्याची भव्यता आणि गूढरम्य वातावरणाचा मनावर ठसा उमटला. मग त्या गुहांची भौगोलिक रचना, त्यांचा इतिहास अशा सर्व विद्यार्थ्यांना उपयुक्त माहितीसह तयार झाली कथा 'चलो मिरॅमॅक'!

बहुतेक सर्व कथांतून उत्साही साहसी युवकांचा गट हेतूपूर्वक साकारला आहे, जेणेकरून वाचकांना तो भावनिकदृष्ट्या जवळचा वाटेल. त्यांच्या करामती प्रेरणादायी ठरतील. 'कॅनियनमधील रहस्य' ही कथासुद्धा 'ग्रँड कॅनियन' बघतानाच मनात रुंजी घालत होती. मग तिथले वन्यजीवन, वनस्पती, भूगर्भशास्त्र, अनेक नैसर्गिक चमत्कार, तिथल्या रेड इंडियन मूळ निवासींचं जीवन या सर्व गोष्टींचा साज कथेला चढवला गेला. अद्‌भुत वनस्पतींमुळे घडलेल्या घटनेमुळे त्यातील रहस्य वाढलं. 'नीरजा कुठे गेली' चे कथाबीज नातींबरोबर अमेरिकेत 'लिट्‌ल मरमेड' ही फिल्म बघताना रुजलं. मग कथेची पार्श्वभूमी म्हणून नीदरलंड देशाची रचना साकारली गेली. बरेच दिवस माझ्या मनात 'चित्रं बोलकी झाली तर'? हा विषय घोटाळत होता. माझं स्वत:चं बालपण मावळात 'भाजे' या गावी गेलं. मग मला एकदम लहानपणी बघितलेला मळवलीचा 'रविवर्मा प्रिंटिंग प्रेस' आठवला. तिथलं 'शिळा प्रेस' तंत्रज्ञान, पीटरबाबाची बंगली, राजा रविवर्मा या थोर चित्रकाराच्या अनेक चित्रांचा तेथील खजिना हे सर्व मी स्वत: अनुभवलेलं आहे. त्या परिसरात करवंदे, जांब, तोरणं या रानमेव्याचे द्रोण भरून विकायला अनेक कातकरणी येत. या घटनांचं एकत्रीकरण होऊन साकारली 'मावळकन्या'.

'पेनडेक' आणि 'पाताळदेवता' या कथांचं बीज सापडलं वर्तमानपत्रातील चार ओळींच्या छोट्या बातमीत! ती होती एका खवलेमांजराला गावकऱ्यांनी कसा त्रास दिला आणि दुसरी बातमी होती सुमात्राच्या जंगलात 'ओरँग उटांग' सदृश प्राणी कसा सापडला याची मग माझ्या डोक्यात विचारचक्र सुरू झाले. या प्राण्यांची शरीररचना, आहारविहार, दृश्य स्वरूप याबद्‌दल इंटरनेटवरून माहिती मिळवली. सदाहरित विषुवृत्तीय जंगल आणि त्यात फुलणारं 'रॅफलशिया अरनोल्डी' हे जगातील आकाराने सर्वात मोठं फूल हे फारच प्रभावी वर्णन मिळालं आणि त्याचा समावेश कथेत केला. या विचित्र प्राण्यांवर

संशोधन करणाऱ्या संशोधकांची माहिती मिळाली. सरस्वती नदी लुप्त का झाली यासंबंधी भौगोलिक माहिती होती; पण या नदीक्षेत्रातील उत्खननासंबंधी पुरातत्ववेत्ता डॉ. देगलूरकर यांचे व्याख्यान ऐकल्यावर 'सरस्वती' नदीवर कथा लिहिण्याचे विचार डोक्यात फेर धरू लागले. इतर कथांच्या बाबतीतसुद्धा थोड्याफार फरकाने असेच घडले. एखादी घटना, एखादी बातमी, प्रत्यक्ष भेट दिलेली स्थान, निसर्गातील प्राणी व वृक्षांसंबंधी इंटरनेटवर मिळालेली आश्चर्यकारक माहिती ही होती या कथांची बीजं! मग कल्पनेचा साज चढून नकळत कथा साकारल्या गेल्या. या सर्व कथा 'छात्र प्रबोधन' मधून प्रसिद्ध झाल्या आहेत. अपवाद इग्वासूच्या कथेचा! वेळोवेळी वाचकांना या कथा आवडताहेत असा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे 'चलो मिरॅमॅक आणि इतर कथा' या पुस्तकाच्या रूपाने या कथा तुमच्यासमोर एकत्रित स्वरूपात ठेवताना खूप आनंद होतो आहे.

छात्र प्रबोधनचे संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांच्या प्रेरणेमुळे या पुस्तकाला मूर्त स्वरूप आले. तसेच 'छात्र प्रबोधन'च्या संपादकीय विभागातील सदस्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. ज्येष्ठ चित्रकार रवि परांजपे यांचे मुखपृष्ठ व गिरीश सहस्रबुद्धे, निलेश जाधव, देवेंद्र कोतवाल, राहुल धामणे,

सचिन जोशी, चंद्रशेखर जोशी यांची आतील चित्रे व आकर्षक मांडणी यामुळे पुस्तकाला देखणे रूप प्राप्त झाले आहे. या सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद! या पुस्तकातील अद्‌भुत कथा तुम्हाला नक्कीच आनंद देतील असा विश्वास आहे.

**- नीलिमा करमरकर**

neelimakishor51@gmail.com

# अनुक्रमणिका


१. ‘सरस्वती’ तू कुठे आहेस? ........................ ९

२. मावळकन्या .................................... १६

३. पेनडेक ........................................ २७

४. माचू पिचू तिती आणि मी ...................... ३६

५. कॅनियनमधलं रहस्य ............................ ४७

६. चलो मिरॅमॅक.................................. ६०

७. फिरुनी नवी जन्मेन मी ........................ ६९

८. कुठे गेली नीरजा?............................ ७९

९. पाताळदेवता.................................. ८९

१०. कथा इग्वासूची ................................ ९६